महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ (NHM) मधील अतिरिक्त ठरलेल्या अधिकाऱ्यांना तालुका कृषि अधिकारी पदावर पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः आकृवि १११७/प्र.क्र.३७१/१५अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र औषधी वनस्पती मंडळामध्ये सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापकांची (म.कृ.से. गट-ब) पुर्वी मंजूर असलेली १० पदे कमी करून ५ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे, मंजूर ५ पदांऐवजी ८ अधिकारी कार्यरत असल्याने मंडळाने प्रस्तावित केल्यानुसार तीन अधिकाऱ्यांना कृषि विभागामध्ये पदस्थापना देणे आवश्यक आहे.

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने विभागातील खालील विवरणपत्रातील महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील अधिका-यांना स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे नांव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१	२	३
१	श्री. सुनिल मारूती राऊत, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक म.रा. फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे	तालुका कृषि अधिकारी, वणी, जि. यवतमाळ (रिक्त पदी)
२	श्री. अशोक एन. धोंडे, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक म.रा. फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे	तालुका कृषि अधिकारी, लांजा, जि. रत्नागिरी (रिक्त पदी)
३	श्री. अशोक बाबुराव चव्हाण, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक म.रा. फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे	तालुका कृषि अधिकारी, बाभुळगाव, जि. यवतमाळ (रिक्त पदी)

२. उपरोक्त अधिका-यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१४५७४३९२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab398652780 90eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.02.12 15:07:09 +05'30'

(उ.म. मदन)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
५. संबंधित विभागीय आयुक्त (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
६. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
७. कृषि सह संचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
९. सर्व संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१०. निवड नस्ती /१५अे.